महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission


मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक:-१५(१)(१६८)/१६६२/सात दिनांक:-२३ फेब्रुवारी, २०२१

# घोषणा

**संचालक, व्यवसाय शिक्षण /प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (जाहिरात क्रमांक ८४/२०१५) या पदाच्या मुलाखतीबाबत.**

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या मूळ अर्ज क्रमांक ३२५/२०१८ व १३/२०२० वरील दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने संचालक, व्यवसाय शिक्षण /प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (जाहिरात क्रमांक ८४/२०१५) या पदाच्या मुलाखतीसाठी निर्धारित केलेल्या निकषानुसार संबंधित उमेदवारांना दिनांक ०४ मार्च, २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता मुलाखतीसाठी बोलाविण्यात येत आहे. संबंधित उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमध्ये मुलाखत पत्र उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. दिनांक ०४ मार्च, २०२१ रोजी बोलाविलेल्या सर्व उमेदवारांनी प्रमाणपत्र तपासणीवेळी त्यांनी अर्जात केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव इत्यादी संदर्भात आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच उमेदवाराने अर्जात केलेल्या दाव्यानुसार उमेदवारांनी धारण केलेला अनुभव जाहिरात व निर्धारित केलेल्या निकषातील तरतुदीप्रमाणे असणे आवश्यक आहे. याची संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. सध्या कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादुर्भाव असल्याने उमेदवारांनी मुलाखतीस येताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

I) मुलाखतीला उपस्थित सर्व उमेदवारांनी पूर्णवेळ किमान तीन पदरी कापडाच्या मास्क चा वापर करणे अनिवार्य आहे.

II) वैयक्तिक स्वच्छतेचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

III) उमेदवारांकडे स्वत:चा सॅनिटायझर असावा व त्याचा वापर आवश्यकतेनुसार करावा.

IV) उमेदवाराने सोशल डिस्टनसिंगचे योग्य प्रकारे पालन करावे.

V) मुलाखतीला येताना उमेदवाराने शक्यतो एकटे यावे. कार्यालयात नातलगांची उगाच गर्दी करु नये.

VI) उमेदवारास कोविड सदृश्य लक्षणे जसे की ताप, सर्दी, खोकला इ. दिसून येत असल्यास कार्यालयास आगाऊ कळवावे.

VII) जंतु संसर्ग टाळण्यासाठी हात न धुता नाक, तोंड व डोके यांना स्पर्श करणे टाळावे.

VIII) उमेदवार टिश्यू पेपर वापरत असल्यास वापर केल्यावर तो तात्काळ बंद कचरापेटीत फेकून द्यावा.

IX) शासनाने कोविड-१९ प्रादूर्भाव वाढू नये यासाठी शासनाकडून वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**उप सचिव (सरळसेवा)**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**ठिकाण: मुंबई**